# जाहिरात

## जिल्हा शल्यचिकित्सक,जिल्हा रुग्णालय,नांदेड

## तदर्थ वैद्यकीय अधिकारी(पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हता धारक,) गट अ यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याबाबत

मा.जिल्हाधिकारी,नांदेड यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या निवड समितीव्दारे आरोग्य सेवा,लातूर मंडळांतर्गत असलेल्या नांदेड जिल्हयातील आरोग्य संस्थेतील महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा (गट अ) यांची **०५ रिक्त पदे** विषेतज्ञ तदर्थ वैद्यकिय अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्यांचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात गुनानुक्रमाने (merit) व मौखिक मुलाखतीनुसार खालील प्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून भरावयाची आहेत.

| अक्र | वैद्यकिय अधिकारी (विशेषज्ञ) | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | स्त्रीरोगतज्ञ | १ |
| ३ | बधिरीकरणतज्ञ | ४ |
| | **एकुण** | ०५ |

१. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यांसाठी किंवा सदर पदावर नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील.

२. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकिय अधिकाऱ्यासारखे म.ना.से.(रजा) नियम लागू राहणार नाही. तसेच ते विमा योजना,भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतीही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाही.त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

३. सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांना धारणाधिकार असणार नाही.

४. कंत्राटी तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहित मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.

५. केवळ तात्पुरती कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा सेवा ज्येष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

६. निवड झालेल्या तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांना मुख्यालयात राहणे बंधनकारक आहे. तसेच त्यांचे बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य आहे.

७. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

८. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना सेवाकाळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांना एक महिन्याची पुर्व नोटीस किंवा एक महिन्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.

९. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.संआसे-२०२२/प्रक्र १९२/सेवा-१ (शिकाना) दि.२७/१२/२०२२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हता धारक विशेषज्ञ.पात्रताधारकांना दरमहा रु.९०,०००/- व इतर भागासाठी रु.८५,०००/- इतके एकत्रित मानधन दिले जाईल.

तसेच एमबीबीएस इतर भागासाठी रु.७५,०००/- व आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या रु.८०,०००/- मानधन दिले जाईल.

१०.कंत्राटी स्वरुपात सेवा असल्याने संबंधित पदावर कायम करण्याचा अधिकार त्यांना सांगता येणार नाही,तसेच त्या अनुषंगाने कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

११.सदर पदावर शासनाकडुन नियमीत पदभरतीने पदे भरण्यात येणार आहेत.सदरील जाहिरातीतील पदसंख्या कमी होण्याची शक्ता आहे.

**१२.उपरोक्त पदातील विशेषज्ञ उपलब्ध न झाल्यास एम.बी.बी.एस.अर्हता धारकांना प्राधान्य देण्यात येईल.**

उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.तसेच अनाधिकृत गैरहजर असलेल्या/संपामध्ये सहभागी असलेले/शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरीता काढून टाकलेले वैद्यकिय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही.सदर भरतीबाबतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

**अ) शैक्षणिक अर्हता:-विशेषज्ञ पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हताधारक,एमबीबीएस**

**ब) थेट मुलाखत** ठिकाण:-**जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय,नांदेड**

दि.१५/०९/२०२६

**E-mail :- cs_nanded@rediffmail.com**

**स्वाक्षरीत**

**सदस्य सचिव,जिल्हा निवड समिती**

**तथा जिल्हा शल्य चिकित्सक,नांदेड**